महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे Rs.2/- कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ◆१४ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक०५४ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

## शहापूर तालुक्यातील दापूर माळ परिसरातील विकासकामांना गती



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : शहापूर तालुक्यातील ग्रामपंचायत अजनूप अंतर्गत असलेल्या दापूर माळ या अतिदुर्गम भागात विकासासाठी तयार करण्यात आलेल्या कृती आराखड्यानुसार दि. १५ ऑगस्ट, २०२५ रोजी सर्व प्रमुख विकासकामांना प्रत्यक्ष प्रारंभ करण्यात येणार आहे.

दि. २३ जुलै, २०२५ रोजी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी घेतलेल्या प्रत्यक्ष पाहणी दौऱ्यात ग्रामस्थांच्या समस्या ऐकून तात्काळ उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. त्यानंतर तातडीने घेतलेल्या बैठकीत रस्ते, घरकुल, पाणीपुरवठा व शाळा बांधकाम या सर्व कामांसाठी सविस्तर कृती आराखडा मंजूर करण्यात आला.

### सुरू होणारी प्रमुख कामे:

- रस्ते: वनविभागाच्या सहकार्याने दापूर माळपर्यंत सुमारे ५ किमी रस्ता उभारणी.
- घरकुल: एकूण ३३ मंजूर घरकुलांसाठी बांधकाम साहित्याची वाहतूक सुरू, CSR निधीमधून विशेष सहाय्य.
- पाणीपुरवठा: अजनूप गावातून दोन टप्प्यांत लिफ्टिंगद्वारे पाणीपुरवठा योजना अंमलबजावणीला प्रारंभ.
- शाळा व अंगणवाडी बांधकाम: साहित्य वाहतूक पूर्ण करून जिल्हा परिषद शाळा व अंगणवाडीच्या इमारतींचे बांधकाम सुरू करण्यात येणार आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी यावेळी सांगितले, "दापूर माळ दौऱ्या दरम्यान ग्रामस्थांनी मांडलेल्या समस्यांचे निरासारण लवकरच करण्यात येणार आहे. वन विभागाशी चर्चा करून त्याची मंजुरी घेण्यात आली आहे. त्यानुसार रस्त्याच्या कामाला स्वातंत्र्य दिनी सुरुवात होणार असून शाळा, पाणी व्यवस्था आणि घरकुलांची कामे देखील हाती घेण्यात आली आहे. तसेच शासनाच्या प्रत्येक योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असणार आहे. तसेच सर्व योजना सर्व सुविधा लवकरात लवकर पुरविण्याबाबत कटीबद्ध आहोत." या कामांच्या सुरुवातीमुळे ग्रामस्थांमध्ये समाधान व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काही महिन्यांत दापूर माळ हा भाग सर्व मूलभूत सुविधांनी सुसज्ज होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# १५ ऑगस्ट रोजी कल्याण-डोंबिवलीत मांसविक्रीवर बंदी कायम

## मांस सेवनास कोणतीही बंदी नाही- पालिका आयुक्तांचे स्पष्टीकरण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : १५ ऑगस्ट रोजी कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने मांस विक्री आणि कत्तलखान्यांवर टाकलेल्या बंदीवरुन वादंग माजला आहे. या बंदी विरोधात विरोधी पक्षांनी आवाज उठवला आहे.या बंदी विरोधात आज डोंबिवलीतील खाटीक समाजाने निदर्शने करीत बंदी उठवण्याची मागणी केली होती. मात्र, कल्याण डोंबिवली महानगर पालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी बंदी निर्णय कायम असून त्यात बदल होणार नसल्याचे स्पष्ट केले आहे. स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर येत्या १५ ऑगस्टला कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या हद्दीत सर्व कत्तलखाने आणि अधिकृत चिकन आणि मटण विक्रेत्यांवर बंदी लादण्याच्या आपल्या निर्णयावर आपण ठाम आहोत असे कडोंमपा पालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी म्हटले आहे. राज्य सरकारने स्थानिक पातळीवर याबाबतचे निर्णय घेण्याचे अधिकार पालिकांना दिलेले आहेत. आमचा निर्णय नव्याने नाही तर जुनाच



असल्याचे केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल यांनी म्हटले आहे.

### नव्याने कुठलाच निर्णय घेतलेला नाही.

राज्य शासनाच्या माध्यमातून पालिका अधिनियम यांच्या अंतर्गत अशा प्रकारचे निर्णय स्थानिक स्वराज्य संस्थेला योग्य वाटत असेल तर घेता येऊ शकतात असे पालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी स्पष्ट केले आहे. त्याचप्रमाणे 1988 मधील जो ठराव पास केला होता, तेव्हापासून या प्रकारची बंदी आपण घालत आलो आहोत असेही ते म्हणाले. नव्याने कुठलाच निर्णय घेतलेला नाही. वर्षानुवर्षे हा निर्णय सुरू आहे. त्याप्रमाणेच या वर्षी देखील हा निर्णय घेण्यात आला आहे असेही अभिनव गोयल यांनी सांगितले आहे.

ही बंदी केवळ कत्तलखाने आणि अधिकृत विक्रेत्यांकरीता आहे. मटण-मासे खाण्यासाठी कुठलीही बंदी नाही असेही पालिका आयुक्त गोयल यांनी म्हटले आहे. स्थानिक पातळीवर जो निर्णय घेता येतो त्याचप्रमाणे हा निर्णय आपण घेत आलेलो आहोत. आपल्याकडे स्थानिक पातळीवर काही निवेदन आले तर त्याच्यावर विचार करून निर्णय घेता येऊ शकेल असेही ते यावेळी म्हणाले.

### निवेदनावर विचार करून योग्य तो निर्णय

नियम तोडणाऱ्यांसाठी आमचा परवाना विभाग आहे त्याप्रमाणे त्यांच्यावर नियमानुसार कारवाई होणार आहे. मालमत्ता जप्त करायची असेल तर त्याचीही एक पद्धत असते. कायदा सुव्यवस्थेचा काही प्रश्न १५ तारखेला निर्माण झाला तर त्याविषयी पोलिसांबरोबर चर्चा करून योग्य ते निर्णय घेऊ असेही गोयल यांनी म्हटले आहे. असेच आदेश काही महापालिकेकडूनही काढण्यात आले आहेत. नागपूर मालेगावसह इतर महापालिकेने हे आदेश काढले आहेत. आमच्याकडे २०१० पासून सगळे ऑर्डर आहेत.निवेदन प्राप्त झालेल्या त्याच्यावर चर्चा करून जर का विपरीत निर्णय झाला तर योग्य त्या माध्यमातून पण आपल्याला कळवला जाईल असेही त्यांनी स्पष्ट केले.

**प्रशासन मागील अनेक वर्षापासून १५ ऑगस्टला शहरातील कत्तलखाने, मटण, मांस विक्री बंद ठेवण्याचे आदेश शासन आदेशाप्रमाणे काढत आले आहे. यात पालिकेने नवीन काहीही आदेश काढलेला नाही. नागपूर, छत्रपती संभाजीनगर, इचलकरंजी अशा काही महापालिकांनी त्यांच्या स्तरावर आदेश काढले आहेत. १५ ऑगस्ट रोजी शहरातील कत्तलखाने बंद राहतील. मटण, मांस विक्री व्यवहारावर शासन निर्णयाप्रमाणे बंदी असेल. नागरिकांच्या खाण्यावर बंदी असे प्रशासनाने कोठेही म्हटलेले नाही, असे आयुक्त गोयल यांनी स्पष्ट केले.**

**'राज्य सरकारने असा कोणताही निर्णय घेतलेला नाही. १९८८ सालापासूनचा हा निर्णय आहे. १९८८ साली या संदर्भातील जीआर काढण्यात आलेला आहे. सध्या अनेक महापालिकांनी या संदर्भातील निर्णय घेतलेला आहे' स्वातंत्र्य दिनी मांस विक्री बंदीच्या काही महापालिकांच्या निर्णयाबाबत त्या महापालिकांना मी विचारलं की तुम्ही अशा प्रकारचा निर्णय का घेतला? तेव्हा त्यांनी मला १९८८ चा जीआर पाठवला. त्यांनी मला हे देखील पाठवलं की दरवर्षी अशा प्रकारचा निर्णय ते घेतात. उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असतानाही अशा प्रकारच्या निर्णयाची प्रत मला काही महापालिकांनी पाठवली.'**

**-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**



**१९८८ मधील जो ठराव पास केला होता, तेव्हापासून या प्रकारची बंदी आपण घालत आलो आहोत असेही आयुक्त म्हणाले. नव्याने कुठलाच निर्णय घेतलेला नाही. वर्षानुवर्षे हा निर्णय सुरू आहे. त्याप्रमाणेच या वर्षी देखील नागपूर, मालेगाव छत्रपती संभाजीनगर, इचलकरंजी या महापालिकांनी त्यांच्या स्तरावर आदेश काढले आहेत.**

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते

# उद्या गडकरी रंगायतनाचे भव्य लोकार्पण

### ज्येष्ठ रंगकर्मी सुहास जोशी यांची प्रमुख उपस्थिती, मान्यवरांची उपस्थिती, 'फोकलोक'चे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे शहराचा सांस्कृतिक मानबिंदू असलेल्या राम गणेश गडकरी रंगायतन नाट्यगृहाच्या नुतनीकृत वास्तूचा भव्य लोकार्पण सोहळा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शुभहस्ते आणि ज्येष्ठ रंगकर्मी सुहास जोशी यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वातंत्र्यदिनी, शुक्रवार, १५ ऑगस्ट, २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार आहे. या अविस्मरणीय सोहळ्यासाठी वनमंत्री गणेश नाईक, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, खासदार नरेश म्हस्के, आमदार डॉ. जितेंद्र आव्हाड, आमदार संजय केळकर, आमदार राजेश मोरे, आमदार ॲड. निरंजन डावखरे उपस्थित राहणार आहेत. तसेच, या निमित्ताने, लोकसंगीतावर आधारित युवा कलाकारांचा 'फोकलोक' हा कार्यक्रम होणार आहे.

विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना राम गणेश गडकरी रंगायतन या वास्तूच्या नुतनीकरणासाठी राज्य शासनाकडून ३१ कोटी रुपये उपलब्ध करून दिले होते. या निधीतून, ठाणे महापालिका आयुक्त सौरभ राव यांच्या मार्गदर्शनाखाली, रंगायतनच्या जुन्या झालेल्या वास्तूला बळकटी देऊन सर्व यंत्रणांचे नुतनीकरण करण्यात आले आहे.

सन १९७८ मध्ये बांधण्यात आलेल्या रंगायतनची १९९८ मध्ये प्रथम मोठ्या प्रमाणावर दुरुस्ती करण्यात आली होती. त्यानंतर आता २६ वर्षांनी नुतनीकरण करण्यात आले आहे. ऑक्टोबर- २०२४ मध्ये नुतनीकरणाचे काम सुरू करण्यात आले. हे काम सुरू




करताना आणि कामाच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर रंगभूमीवर कार्यरत असलेले कलाकार, दिग्दर्शक, निर्माते यांच्याशी महापालिकेने सविस्तर चर्चा व प्रत्यक्ष पाहणीही केली. त्यानुसार, गडकरी रंगायतनचे संपूर्ण रुप पालटून टाकण्यात आले आहे.

इमारतीची संपूर्ण स्ट्रक्चरल दुरुस्ती, इमारतीवरील नवीन शेड, नाट्यगृहामधील संपूर्ण नवीन फ्लोअरिंग, रंगमंचाचे नुतनीकरण, नवीन खुर्च्या, नवीन फॉल सिलिंग, नवीन अकॉस्टिक पॅनल, संपूर्ण रंगरंगोटी, नवीन अग्निशमन यंत्रणा, नवीन दरवाजे-खिडक्या, नवीन गालिचा व फर्निचर, समोरील व मागील बाजूच्या दर्शनी बाजूचे सुशोभीकरण, नवीन सुरक्षा केबिन, संपूर्ण वायरिंग आणि विद्युतीकरण नव्याने करणे, नवीन ट्रान्सफॉर्मर व जनरेटर बसविणे, ज्येष्ठ नागरिकांकरिता उद्वाहक (लिफ्ट) बसविणे, रंगमंचावरील लाईट्स व ध्वनी यंत्रणा, नवीन वातानुकूलित यंत्रणा आदी कामे या निधीतून करण्यात आली आहेत.

### नांदी आणि फ्लूजन

लोकार्पण सोहळ्यासाठी गडकरी रंगायतन आणि त्यासमोरील पूर्ण रस्ता दोन्ही बाजूंनी सजवण्यात येणार आहे. प्रत्यक्ष कार्यक्रमात ज्येष्ठ शास्त्रीय गायक मुकुंद मराठे यांच्यासह संपदा माने, तन्वी गोरे, शरण्या शेणॉय, धवल भागवत, श्रीकर कुलकर्णी, प्रतीक फणसे हे युवा कलाकार नांदी सादर करणार आहेत. त्यांना केदार भागवत (ऑर्गन) आणि आदित्य पानवलकर (तबला) हे कलाकार वादन साथ करतील. तसेच, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय स्तरावर नावाजलेले ठाण्यातील मान्यवर कलाकार 'फ्लूजन' हा कलाविष्कार सादर करणार आहेत. त्यात, पं. विवेक सोनार (बासरी), पं. मुकुंदराज देव (तबला), मोहन पेंडसे (व्हायोलीन), किरण वेहेले (कीबोर्ड), अभिषेक प्रभू (बेस गिटार) आणि सचिन नाखवा (ड्रम्स) हे कलाकार सहभागी होणार आहेत.

**'फोकलोक' कार्यक्रमाच्या प्रवेशिका रंगायतन येथे मिळणार :** नुतनीकृत रंगायतनचा लोकार्पण सोहळा झाल्यानंतर 'फोकलोक' हा लोकसंगीतावर आधारित युवा कलाकारांचा दमदार कार्यक्रम ठाणेकर रसिकांना विनामूल्य पाहता येईल. या कार्यक्रमात, रंगायतनमधील पहिल्या दहा रांगा निमंत्रितांसाठी राखीव असतील. उपबल्ध प्रवेशिकांचे वितरण गुरूवार, १४ ऑगस्ट रोजी दुपारी १२.०० वाजता गडकरी रंगायतनच्या तिकिट खिडकीवर सुरू होईल. या प्रवेशिका विनामूल्य आहेत. प्रथम येणाऱ्यास प्राधान्य या तत्त्वावर प्रवेशिकांचे वितरण होईल. एक व्यक्तीस दोन प्रवेशिका घेता येतील.

# कल्याण-शिळफाटा वाहतूक कोंडी राष्ट्रवादी आक्रमक

## वाहनकोंडीवर उपाययोजना करा अन्यथा आंदोलनाचा इशारा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : कल्याण शीळ रोडवर दररोज मोठ्या प्रमाणात वाहन कोंडी होत आहे. तासनतास वाहने कोंडीत अडकून पडतात. या कोंडीचे मुख्य कारण म्हणजे मेट्रो कंत्राटदाराचा बेशिस्तपणा आणि कल्याणशीळ रोड वरून होणारी अवजड वाहनांची वाहतूक होत आहे. शहरात देखील वाहन कोंडीची समस्या निर्माण झाली आहे. या वाहनकोंडीवर उपाययोजना करा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाने दिला आहे.

डोंबिवली शहर व मुख्यतः कल्याण शिळफाटा मार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी होत आहे. त्यातच मेट्रोचे काम करणाऱ्या कंत्राटदार सामानाची वाहतूक बेशिस्तपने करत आहेत. कल्याण शीळ रोडवरून सर्रास अवजड वाहने धावतात. यासोबतच डोंबिवली शहरात देखील मोठ्या प्रमाणात वाहन कोंडी होत आहे. रस्त्यांची खड्डे पडून दुरावस्था झाली आहे. शहरातील अंतर्गत रस्त्यांवर देखील बांधकाम साहित्याची अवजड वाहने धावतात. रिक्षाची संख्या भरमसाठ वाढली आहे. नागरिकांना वाहतूक कोंडीचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे.

या विरोधात कोळसेवाडी वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन सांडभोर आणि डोंबिवली शहर वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीराम पाटील यांची भेट घेऊन राष्ट्रवादी शरदचंद्र पवार गटाने निवेदन दिले आहे. तसेच वाहतूक सुरळीत करण्यासंदर्भात काही मागण्या करण्यात आल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार पक्षाचे डोंबिवली शहराध्यक्ष भालचंद्र उर्फ भाऊ पाटील यांनी सांगितले.

यावेळी कल्याण जिल्हा उपाध्यक्ष राजेश शिंदे, कल्याण ग्रामीणचे अध्यक्ष मधुकर माळी, डोंबिवली शहराचे कार्याध्यक्ष रविकिरण बनसोडे उपस्थित होते. वाहतुक कोंडीची समस्या सुटली नाही तर येत्या काळात आंदोलन करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी शरद पवार गटाने दिला आहे.






# भिवंडी महानगरपालिकेमार्फत 'हर घर तिरंगा' यात्रेचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



भिवंडी : केंद्र शासनाच्या सुचनेप्रमाणे दि.०२ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट २०२५ दरम्यान हर घर तिरंगा मोहीम राज्य शासनामार्फत राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने भिवंडी शहरामध्ये तिरंगा यात्रेचे आयोजन भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेमार्फत दि.१३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.३० ते १०.३० या दरम्यान मुख्यालयात क्रीडा विभागामार्फत तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. तिरंगा यात्रेची सुरूवात पालिका अति-आयुक्त मा. श्री विठ्ठल डाके यांनी केली सर्व उपस्थितीत भारताचा विकास व प्रगतीसाठी स्वःता ला समर्पित करीन अशी शपथ सर्वांना देण्यात आली पालिका अति-आयुक्त मा. श्री विठ्ठल डाके यांनी तिरंगा यात्रेला तिरंगा ध्वज दाखवुन यात्रेला सुरूवात केली त्यानंतर पालिका मुख्यालय ते स्व. आनंद दिघे चौक हसीन सिनेमा जुनी महानगरपालिका इमारत मार्ग पालिका मुख्यालया पर्यंत तिरंगा यात्रा काढण्यात आली. तिरंगा यात्रामध्ये भारत माता की जय, वंदे मातरम् अशा घोषणा देऊन हर घर तिरंगा या उपक्रमाची जनजागृती करण्यात आली या मध्ये भिवंडी शहरातील १६ माध्यमिक शाळेतील ५५० विद्यार्थी उपस्थित होते. या तिरंगा यात्रेत शालेय विद्यार्थी हे विविध राष्ट्रीय नेत्यांच्या वेशभुषेत सामिल झाले होते तसेच विद्यार्थीवर्गाने लेझिम पथकाच्या विविध खेळ सादर करुन राष्ट्रीय भावना निर्माण केल्या.

या वेळी उप-आयुक्त मुख्यालय विक्रम दराडे, सहाय्यक आयुक्त (क्रीडा) नितिन पाटील, प्रभाग समिती क्र. ०१ चे सहाय्यक आयुक्त, उद्यान विभाग निलेश संखे, शिक्षण अधिकारी उमेश संभारी, क्रीडा विभाग प्रमुख मिलिंद पळसुले, क्रीडा अधिकारी शरद कलावंत, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आबिटघर ग्रामपंचायतची ग्रामसभा संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वाडा : ग्रामपंचायत आबिटघर सरपंच सौ.साक्षी संतोष साठे यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी आयोजित केलेल्या मागील 3 वर्षांपासून घेतलेल्या सर्वच्या सर्व ग्रामसभा आजपर्यंत तहकुब न होता यशस्वीरित्या संपन्न करून त्यांनी तालुक्यात एक विक्रम नोंदवला आहे.

आज दिनांक 13/8/2025 रोजी बोलावलेली ग्रामसभा अतिशय खेळीमेळीच्या वातावरणात यशस्वी झाली. या ग्रामसभेत आदर्श सरपंच पुरस्कार प्राप्त सरपंच सौ. साक्षी संतोष साठे व समाजरत्न पुरस्कार प्राप्त ग्रामपंचायत सदस्य श्री.भरत जाधव यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर अजेंड्यावर असलेल्या विषयावर सखोल चर्चा होऊन वैयक्तिक लाभ तसेच सार्वजनिक हिताच्या विषयावर ठराव पारीत करून ग्रामसभेने मान्यता दिली. पर्यावरणाची होणारी हानी थांबवण्यासाठी वृक्षारोपण करणे, हरितपट्टे निर्माण करणे, पाणी आडवून ते जमिनीत जिरवण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यासाठी ठराव घेऊन पारित करण्यात आले. सोबतच माझी वसुंधरा व ग्रामस्मार्ट अश्या उपक्रमात भाग घ्यावा असे ग्रामसभेने घोषित केले.

आबिटघर ग्रामपंचायतीच्या सरपंच सौ.साक्षी संतोष साठे या सातत्याने लोकाभिमुक उपक्रम राबवून आपल्या ग्रामपंचायतिचा लौकिक वाढवत असतात.


## ठाणे महानगरपालिका, ठाणे

"अनधिकृत बांधकामामध्ये सदनिका /खोली /गाळे खरेदी करु नये यासंबंधी नागरीकांना जाहिर आवाहन / सूचना"

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांना या जाहीर प्रसिध्दी/ सूचनेद्वारे आवाहन करण्यात येते की, ठाणे महानगरपालिकेच्या असे निदर्शनास आले आहे की, महापालिका हद्दीमध्ये काही व्यक्ती / संस्था / विकासक हे अनधिकृतपणे आणि बेकायदेशीरपणे अनधिकृत बांधकामे करुन अशा अनधिकृत बांधकामांच्या खरेदी, विक्रीचे व्यवहार करतात. अनधिकृत बांधकामे करणे, अनधिकृत बांधकामांचा व्यवहार करणे, अनधिकृत बांधकामांमध्ये वास्तव्य करणे हे पूर्णपणे बेकायदेशीर आहे. अशा अनधिकृत बांधकामांसंदर्भात भविष्यात महापालिकेकडून कायदेशीर कारवाई पूर्ण करुन कोणत्याही क्षणी अनधिकृत बांधकामे निष्कासित करणेची कारवाई करण्यात येवू शकते. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये अशा प्रकारची अनधिकृत बांधकामे करणे हा गुन्हा आहे. तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई येथे दाखल असलेल्या जनहित याचिका (सुमोटो) क्र. १/२०२० व रिट याचिका क्र. ५८९८/२०२५ (सुभद्रा रामचंद्र टकले विरुध्द ठामपा व इतर) मध्ये अशा प्रकारच्या अनधिकृत बांधकामांच्या सेवा खंडीत करुन ते निष्कासित करणेबाबत मा. न्यायालयाने आदेश दिलेले आहेत.

महानगरपालिकेच्या सहाय्यक आयुक्त तथा पदनिर्देशित अधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे आढळले, तर ते निष्कासित करण्यात येईल. त्याचप्रमाणे अशा अनधिकृत बांधकाम करणाऱ्याविरुध्द फौजदारी गुन्हे दाखल करण्याचे कायदेशीर अधिकार प्रदान करण्यात आले आहेत.

आणि, अशा बेकायदा बांधकामांवर कारवाई करताना ज्या व्यक्ती/ संस्था/ विकासक महानगरपालिकेद्वारे कायदेशीर कारवाईच्या प्रक्रियेत अडथळा आणतील त्यांच्यावर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ३९७अ अन्वये कायदेशीर कारवाई केली जाईल, अनधिकृत बांधकाम करणाऱ्या व्यक्तीस किमान ०३ वर्षे तुरुंगवास आणि रु. ५०,०००/- दंडाच्या शिक्षेची तरतुद आहे. महापालिकेद्वारे अनधिकृत बांधकाम पाडण्याची कार्यवाही सुरू आहे आणि भविष्यातही अशीच सुरू राहील.

व्यक्ती /संस्था/विकासकाने कोणतेही बांधकाम करण्यापूर्वी ठाणे महानगरपालिकेची रितसर बांधकाम पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. जे नागरिक बेकायदा मालमत्तेची विक्री/ खरेदी/ हस्तांतरण करीत असतील त्यांनी ही बाब तपासणे आवश्यक आहे. जेणेकरुन इमारतीची विक्री / खरेदी / हस्तांतरण व्यवहारात आर्थिक नुकसान व मानसिक त्रास सहन करावा लागणार नाही.

सबब, ठाणे महानगरपालिकेच्यावतीने सर्व नागरिकांना जाहीर आवाहन करण्यात येते की, ज्या व्यक्ती /संस्था/विकासक यांनी महानगरपालिकेकडून रीतसर परवानगी न घेताच बांधकाम केले आहे, अशा अनधिकृत बांधकमामध्ये सदनिका / खोली / गाळे खरेदी करु नये, याची गांभीर्याने दखल घ्यावी.

सदरचे जाहीर आवाहन हे ठाणे महानगरपालिकेकडून, सार्वजनिक हितासाठी आणि सर्व नागरिकांच्या माहितीसाठी जारी करण्यात येत आहे.

ठामपा/पिआरओ/अ.नि.नि./ ५२७/२०२५-२६
दि.१३.०८.२०२५
Please visit our official website
www.thanecity.gov.in

**सही/-**
(सौरभ राव भा.प्र.से)
प्रशासक तथा आयुक्त
ठाणे महानगरपालिका, ठाणे


## गीतासार

### अध्याय १८
### मोक्षसंन्यासयोगः

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ।
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च
॥ १८-५१ ॥

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ।
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥ १८-५२ ॥
अहङ्कारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् । विमुच्य निर्ममः शान्तो ब्रह्मभूयाय कल्पते
॥ १८-५३ ॥

विशुद्ध बुद्धीने युक्त; हलके, सात्त्विक आणि नियमीत भोजन घेणारा; शब्दादी विषयांचा त्याग करून, एकांतात शुद्ध ठिकाणी राहणारा; सात्त्विक धारणाशक्तीने अंतःकरण व इंद्रिये यांच्यावर संयम ठेवून, मन, वाणी आणि शरीर ताब्यात ठेवणारा; राग-द्वेष पूर्णपणे नाहीसे करून चांगल्या प्रकारे दृढ वैराग्याचा आश्रय घेणारा; अहंकार, बळ, घमेंड, कामना, क्रोध, संग्रहवृत्ती यांचा त्याग करून नेहमी ध्यानयोगात तत्पर असणारा; ममतारहित व शांतियुक्त असा पुरुष सच्चिदानंदघन ब्रह्मामध्ये एकरूप होऊन राहण्यास पात्र होतो. ॥ १८-५१, १८-५२, १८-५३ ॥

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति । समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम्
॥ १८-५४ ॥

मग तो सच्चिदानंदघन ब्रह्मात तद्रूप झालेला प्रसन्न चित्ताचा योगी कशाबद्दलही शोक करीत नाही आणि कशाचीही इच्छा करीत नाही. असा सर्व प्राण्यांच्या ठिकाणी सम भाव बाळगणारा योगी माझ्या पराभक्तीला प्राप्त होतो.
॥ १८-५४ ॥

## रेसिपी

### नारळाची गोड पोळी



साहित्य
- गव्हाचं पीठ - 1 ते 2 कप
- ओलं खोबरं - 1/2 कप
- पांढरे तीळ - 2 चमचे
- साखर - 1/2 चमचे
- दूध - 1 कप
- वेलचीपूड - 1/2 चमचा
- साजूक तूप - 1 चमचा
- ड्रायफ्रुट्स -
- मीठ

कृती

पोळी तयार करताना एका खोलगट भांडं घ्या. त्यात कणीक, मीठ,साखर, तूप आणि कोमट दूध घालून कणिक मळून घ्यावीत.कणिक 15 मिनिटे झाकून मुरू द्यावी.यानंतर मिक्सरमध्ये ड्रायफ्रूट्सची भरड काढून घ्यावी.सारणासाठी खोबरं खोवून घ्यावे आणि तीळाची पूड तयार करावी. पोळी लाटून त्यात ड्रायफ्रूट्स भरड, खोबरं, तीळाची पूड यांचे सारण भरावे.आता पोळीचे तोंड बंद करावे.पुन्हा हलक्या हाताने पोळी लाटून घ्यावी.तवा गरम झाल्यावर पोळी तव्यावर टाकून तूप सोडावे.तूप टाकून पोळी दोन्ही बाजूंनी खरपूस भाजून घ्यावी.

## केडीएमसीच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागामार्फत
# नेहरु कप हॉकी स्पर्धेचे आयोजन

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : क्रीडा व युवक सेवा,महाराष्ट्र राज्य, पुणे आणि कल्याण डोंबिवली महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने नेहरु कप हॉकी स्पर्धा 2025-26 चे आयोजन सब ज्युनियर, ज्युनिअर मुले आणि मुलींच्या स्पर्धेचे आयोजन दि. 11 व 12 ऑगस्ट 2025 रोजी डॉन बॉस्को हायस्कुल, आधारवाडी, कल्याण (प) येथील मैदानावर घेण्यात आली होती. सदर स्पर्धेचे आयोजन महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या मागदर्शनाखाली करण्यात आले असून सदर स्पर्धेचे उद्घाटन महापालिकेच्या क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.

या नेहरु कप हॉकी स्पर्धेत ज्युनिअर/सबज्युनिअर मुले व मुलींचे एकुण 15 संघ सहभागी झाले होते. 17 वर्ष मुलांच्या अंतिम सामन्यात डॉन बॉक्सो हायस्कुल, कल्याण विरुध्द डॉन बॉक्सो हायस्कुल, डोंबिवली या दोन संघामध्ये अंतिम सामना झाला. यात डॉन बॉस्को हायस्कुल, कल्याण हा संघ विजयी झाला. त्याचप्रमाणे 17 वर्षाखालील मुलींच्या अंतीम सामना रिटा मेमोरिअल, कल्याण विरुध्द डॉन बॉक्सो, कल्याण या दोन संघामध्ये झाला. यात रिटा मेमोरिअल, कल्याण हा संघ विजयी झाला. 15 वर्षाखालील मुलांच्या संघात डॉन बॉक्सो, कल्याण विरुध्द रिटा मेमोरिअल, कल्याण या संघात अंतिम सामना झाला. यात डॉन बॉक्सो, कल्याण हा संघ विजयी झाला. सर्व विजेत्या संघाना ट्रॉफी व मेडल देऊन गौरविण्यात आले आहे. तसेच पंच, मदतनीस व खेळ प्रमुख यांचे मानधन देण्यात आले.सदर प्रसंगी क्रीडा व सांस्कृतिक विभागाचे क्रीडा पर्यवेक्षक प्रविण कांबळे, खेळप्रमुख डॉ. विजय सिंग, रेणुका पिसे, संतोष पाटील, डॉन बॉस्को शाळेचे मुख्याध्यापक, कृष्णा माळी तसेच सहभागी शाळांचे क्रीडा शिक्षक तसेच शिक्षण व क्रीडा विभागातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# मनोर येथे आदिवासी दिन उत्साहात साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर ग्रामीण : आदिवासी जागतिक दिनानिमित्त विविध कार्यक्रम आयोजित करून क्रांतीसुर्य भगवान बिरसा मुंडा चौक, मनोर येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

जागतिक आदिवासी दिन सर्वत्र साजरा होत असताना आदिवासी एकता मित्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष संतोष जनाठे यांच्या अध्यक्षतेखाली येथे हा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. या वेळी आदिवासी बांधवांनी विविध उपक्रम साजरे केले. तर आपली संस्कृती टिकवण्यासाठी पारंपरिक तारपा व गौरी नृत्य करण्यात आले. तसेच जागतिक मूलनिवासी दिवस व भारतीय आदिवासी समाजाची भूमिका यावर मान्यवरांनी मार्गदर्शन केले.

या प्रसंगी पोलिस निरीक्षक रणवीर बयेस, प्रमुख वक्ते धरतरी ग्रामोद्योग संकुलाचे मधुकर माळकरी, सरपंच चेतन पाटील, उपसरपंच वंदनाताई चंपानेरकर, माजी सरपंच अनंत पुंजारा, दामोदर भुयाळ, ग्रामपंचायत सदस्य, लोकप्रतिनिधी, आदिवासी एकता मित्र मंडळाचे पदाधिकारी, सदस्य व आदिवासी बांधव मोठ्या संखेने उपस्थित होते.

## शारदा इंग्लिश मिडीयम शाळेच्या विद्यार्थ्यांची
# कराटेमध्ये राष्ट्रीय स्तरावर धवल कामगिरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

वासिंद : शोतोकान कराटे असोसिशन इंडिया आयोजित राष्ट्रीय स्तरीय कराटे स्पर्धा कोळी समाज हॉल ठाणे येथे पार पडली त्या मध्ये शारदा इंग्लिश मिडीयम स्कुल वासिंद कु. धृती हालके इ 7 वी हिने 12 वर्ष वयोगट 40 की वजन गट मध्ये सुवर्ण पदक मिळविले कु. हंसिका मारुती पाटील इ. 7 वी.12 वर्षे वयोगट 50 की वजन गट मध्ये सुवर्ण पदक मिळविले कु, नमन दिनेश पाटील इ,3 री 8 वर्ष वयोगट मध्ये रौप्य पदक मिळविले कु,जय हिवाळे इ ,6 वी 30 की वजन गट व कु,वैष्णवी ज्ञानेश्वर पाटील इ, 7 वी यांनी 12 वर्ष वयोगट 45 की,वजन गट मध्ये कांस्य मिळवून शाळेचे नाव लौकिक केले आहे सर्व विद्यार्थी व क्रीडा शिक्षक (कराटे प्रशिक्षक) श्री दौलत चव्हाण सर यांचे श्री, विठ्ठल सातवी साहेब, चेअरमन विद्या विकास मंडळ वासिंद तसेच श्री, रविंद्र शेलार साहेब, सेक्रेटरी विद्या विकास मंडळ, वासिंद सर्व संचालक, प्राचार्य श्री प्रशांत जाधव सर यांनी अभिनंदन केले आणि कौतुक करून पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

## डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात
# डॉ. एस. आर. रंगनाथान यांची जयंती साजरी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता



पेण : पेण येथील डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात ग्रंथालयशास्त्राचे जनक म्हणून ओळखले जाणारे डॉ. एस. आर. रंगनाथान यांची जयंती उत्साहपूर्ण वातावरणात साजरी करण्यात आली. या निमित्ताने ग्रंथालय उदबोधन वर्ग व कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. मुरलीधर वाघ होते. आपल्या मनोगतात त्यांनी विद्यार्थ्यांना वाचन संस्कृती, ज्ञानार्जन व ग्रंथालयाचा प्रभावी वापर याबाबत मार्गदर्शन केले. ग्रंथपाल मंगेश भित्रे यांनी प्रोजेक्टरच्या सहाय्याने डॉ. रंगनाथान यांचे कार्य व योगदान यावर सविस्तर माहिती दिली. तसेच महाविद्यालयातील प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांना ग्रंथालयाची ओळख करून देत विविध सेवा व ग्रंथालयाच्या वेबसाईटची माहिती दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. लक्ष्मण कुमारे यांनी केले, तर आभार प्रा. संजय मेघशाम यांनी मानले. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. यावेळी प्रा. डॉ.बागडे, प्रा.डॉ. पवार, प्रा. डॉ.सरगर, प्रा.डॉ. शेख, प्रा. डॉ.महादाने, प्रा.डॉ.वळवी, प्रा.टोंगारे व प्रा.डॉ. पुजारी आदी मान्यवर उपस्थित होते.



## उल्हासनगर महानगरपालिकेत एनडीआरएफचे प्रशिक्षण



दिनांक १२ ऑगस्ट २०२५ रोजी उल्हासनगर महानगरपालिकेत एनडीआरएफ टीम व कल्याण आपत्ती व्यवस्थापन अधिकारी यांच्यामार्फत उल्हासनगर महापालिकेत सुरक्षा विभागात अग्निशमन विभाग यांच्या कर्मचाऱ्यांना नैसर्गिक आपत्ती व मानवनिर्मित आपत्ती याबाबत एनडीआरएफचे कुमार यांनी प्रशिक्षण दिले तसेच पूर्जन्य परिस्थितीत घरातील साधनसामुग्रीच्या साह्याने नागरिकांचा जीव वाचवला जाईल याबाबत प्रशिक्षण दिले.

# रायगड जिल्ह्यातील ग्राहक तक्रार निवारण आयोगावर सदस्यांची नेमणूक करा

## जयपाल पाटील यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : रायगड जिल्ह्यातील ग्राहक तक्रार निवारण आयोगावर न्यायालय हे अलिबाग जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयातवरील बाजुस आहे. येथे राज्य सरकार कडुन पदे मंजूर करण्यात येतात. सध्या येथे २ पदे रिक्त आहेत. आठवड्यातून गुरुवार व शुक्रवार २ दिवस बेलापूर न्यायालयातुन महिला न्यायाधीश येतात. त्या दिवसात कामकाज चालते. या न्यायालयात जुन अखेर ९५७प्रकरणे शिल्लक आहेत. येथील २ सदस्यां पैकी सन १८-१९ ला बदली झाली तर सन २०२४ ला दुसरे सदस्य यांची बदली झाली. येथील निकाल देताना किमान ३ पैकी २ सदस्य असतील तरच निकाल देण्यात येऊ शकतो. सध्या २५ केसचा निकाल लागतो. ग्राहक तक्रार दाखल करण्यास महाड, श्रीवर्धन, म्हसळा, माणगाव येथून येतात मात्र येथील जनतेस वेळ, पैसा व मानसिक त्रास सहन करावा लागत आहे. यासाठी २ सदस्यांची नेमणूक तातडीने करावी. ज्यामुळे रायगड जिल्ह्यातील ग्राहकांची आपत्ती दुर होईल. अशी मागणी ज्येष्ठ पत्रकार तसेच आपत्ती व सुरक्षा विषय तज्ञ जयपाल पाटील यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.









**मेष**

कुटुंबासोबत वेळ घालवाल. आनंदाचे वातावरण निर्माण होईल. आजूबाजूचे लोक तुमच्या मेहनतीने प्रभावित होतील आणि तुमचे अनुसरण करतील.

**वृषभ**

सर्व प्रकारची कामे पूर्ण करण्यास तयार असाल. विचारपूर्वक केलेल्या कृतीतून तुम्हाला फायदा होऊ शकतो. प्रयत्न केल्यास यश मिळू शकते.

**मिथुन**

तुम्ही जे काही काम करण्याचा प्रयत्न कराल, त्या कामात तुम्हाला यश मिळेल. आज तुम्हाला तुमच्या मेहनतीचे फळ मिळेल, यामुळे तुमचे मनोबल वाढेल.

**कर्क**

तुमचे आरोग्य चांगले राहील.महिलांसाठी आजचा दिवस चांगला आहे जे कोणताही व्यवसाय करण्याचा विचार करत आहेत. काम करताना घाई करू नका.

**सिंह**

व्यवसायात चांगला फायदा होईल. आर्थिक बाजू मजबूत होईल. नवीन जमीन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर घरातील ज्येष्ठांचे मत अवश्य घ्या.

**कन्या**

राजकारणाशी संबंधित लोकांसाठी दिवस चांगला आहे, समाजहितासाठी केलेल्या कामाचे कौतुक होऊ शकते. नोकरीत नवीन यश मिळण्याची शक्यता आहे.

**तूळ**

तुम्ही आव्हानांचा सामना कराल, तुम्ही त्यांचा धैर्याने सामना कराल आणि तुम्हाला यश मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस सामान्य असेल.

**वृश्चिक**

कामाबाबत काही नवीन कल्पना मिळू शकतात. तुम्ही त्यांच्यावर लवकरच काम सुरू करू शकता. अभियंत्यांसाठी दिवस फायदेशीर असणार आहे.

**धनु**

विद्यार्थ्यांसाठी दिवस समाधानकारक असेल, त्यांना काहीतरी नवीन शिकायला मिळेल. तुम्हाला एखाद्या वयोवृद्ध व्यक्तीची सेवा करण्याची संधी मिळेल.

**मकर**

घरगुती जीवनावश्यक वस्तू खरेदी कराल आणि व्यवहारही जलद होऊ शकतात. एखादी मोठी जबाबदारी तुम्ही चांगल्या प्रकारे पार पाडाल.

**कुंभ**

करिअरशी संबंधित निवड तुम्हाला काही अडचणीत टाकू शकते परंतु योग्य बिंदू निवडणे चांगले होईल. आई-वडिलांचा आशीर्वादने सर्व अडचणी दूर होतील.

**मीन**

करिअरमधील चढ-उतारांमुळे तुम्ही त्रस्त असाल, परंतु काही अनुभवी वरिष्ठांच्या मदतीने तुम्हाला आराम मिळेल.घरात मुलांसोबत चांगला वेळ घालवाल.




# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

जुना एस.टी. स्टॅण्ड, कापआळी, भिवंडी ४२१ ३०२, जि.ठाणे TEL: 02522-55314/55315, FAX: 02522-52074

## सूचना

**भिवंडी निजामपुर शहर महानरपालिकेच्या प्रारुप प्रसिध्द विकास योजनेच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या फेरबदलांबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २८(४) अन्वये करावयाचे प्रसिध्दीकरण.**

ज्या अर्थी, भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेने नियोजन प्राधिकरण म्हणून महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६ (१) (यापुढे याचा उल्लेख "उक्त अधिनियम" असा करण्यात येईल) अन्वये प्रारुप विकास योजना (उक्त विकास योजना) तयार करुन ती दि.१२/१०/२०२३ रोजीच्या सुचनेव्दारे नागरीकांकडून सूचना / हरकती मागविण्यासाठी प्रसिध्द केलेली होती. सदर सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, असाधारण भाग २, ऑक्टोबर १२-१८, २०२३ रोजी तसेच स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्द झालेली आहे. आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेवर विहित मुदतीत प्राप्त सूचना / हरकतींचा विचार करुन उक्त अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये स्थापन झालेल्या नियोजन समितीने त्यांचा अहवाल नियोजन प्राधिकरण तथा मा. प्रशासक यांच्याकडे दि. ३१/०१/२०२५ रोजी सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने तो मान्य करुन, उक्त प्रारुप विकास योजनेत महाराष्ट्र प्रादेशीक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम २८ (४) अंतर्गत फेरबदल / बदल करण्यासाठी व ती उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनाकडे मंजूरीस्तव सादर करण्यासाठी प्रशासकीय ठराव क्र. ९०० दि.०७/०८/२०२५ रोजी पारीत केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २८ (४) खालील तरतुदीनसार, उक्त योजनेच्या मसुद्यात / प्रारुप विकास योजनेत केलेले फेरबदल / बदल नागरीकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करणे आवश्यक आहे. आणि त्याअर्थी, उक्त प्रारुप विकास योजना मसुद्यात नियोजन प्राधिकरण तथा मा. प्रशासक यांनी उक्त अधिनियमाच्या कलम २८ (४) नुसार केलेल्या फेरबदलांची सुची परिशिष्ठ 'अ' मध्ये नमूद केल्याप्रमाणे नागरीकांच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ प्रसिध्द करण्यात येत आहे. सदर फेरबदल / बदल निळया रंगाने उक्त प्रारुप विकास योजनेत दर्शविण्यात आले असून सदर नकाशा भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयातील तळ मजला या ठिकाणी कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधी करीता नागरीकांच्या अवलोकनार्थ प्रसिध्द करण्यात आलेला असून महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर (www.bncmc.in) देखील उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

**सही/-**
**अनमोल सागर (भाप्रसे) प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

**परिशिष्ट- अ**

**अधिनियमाचे कलम २८ (४) नुसार केलेल्या फेरबदल / बदलांची सुची**

**भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका**

| फेरबदल क्रमांक | गांवाचे नांव | फेरबदल / बदलांचा तपशील |
|---|---|---|
| M१ | मौजे-कणेरी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. १६९ (कब्रस्थान) या आरक्षणाचा पश्चिमेकडील अर्धा भाग आ.क्र. १६९ दफनभुमी साठी आरक्षित केलेला आहे व पुर्वेकडील मंदिरालगतचा भाग आ. क्र. १६९अ बगिचा म्हणुन दर्शविण्यात आलेला आहे. तसेच ग्रेवयार्ड या आरक्षणाचे नामाभिधान बदलुन दफनभुमी (बरीअल ग्राऊंड) करण्यात आलेले आहे. |
| M२ | मौजे - टेमघर | टेमघर गावठाणातील सोनादेवी मंदिर नकाशात दर्शविण्यात आलेले आहे. |
| M३ | मौजे - टेमघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे टेमघर येथील विद्यमान ६ मी. रुंद रस्ता प्रस्तावित १८ मी. रस्तारुंदीकरण म्हणुन दर्शविण्यात आलेले आहे. |
| M४ | टेमघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र २३३ डब्ल्यु.टि.पी. या आरक्षणाचे दोन भागात विभाजन केलेले आहे. त्यातील पश्चिमेकडील भागाला आ.क्र.२३३ डब्ल्यु.टि.पी. कायम ठेऊन पुर्वकडील उर्वरीत आ.क्र. २३२ व १२ मी. पोहच रस्ता या खालील भागाला आ.क्र २३३ अ बोटॅनिकल गार्डन म्हणुन आरक्षित करण्यात आलेले आहे. |
| M५ | मौजे-टेमघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे टेमघर येथील जागा सार्वजनिक/निमसार्वजनिक वापर वगळून त्या खालील क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M६ | मौजे भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी येथील १२ मी. रुंद विकास योजना रस्ता रद्द करण्यात आलेला आहे. व त्या खालील मुक्त झालेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M७ | मौजे-भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे-भिवंडी, सि.स.नं.-२६०९ ची हद्द सुधारीत करण्यात आलेली आहे. |
| M८ | मौजे-भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी, सि.स.नं.२३८८ ते सि.स.न. २३९९ पर्यंतचा ९ मी. रुंद विकास योजना रस्ता रद्द करण्यात आलेला आहे. सदर बदलामुळे मुक्त झालेली क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M९ | मौजे-भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. ६५ बगिचाचे नामाभिधान बदलुन स्लम इम्प्रुव्हमेंट स्किम असे करण्यात आलेले आहे. तसेच आ.क्र. ६५ दोन भागात विभागले असुन एका भागास आरक्षण क्रमांक ६५ स्लम इम्प्रुव्हमेंट स्किम, व पुर्वेकडील दुसऱ्या भागास आरक्षण क्रमांक ६५ अ देण्यात आलेला आहे. व त्याचा वापर पुर्ववत बगिचा म्हणुन कायम ठेवण्यात आलेला आहे. |
| M१० | मौजे-भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी मधील सि.स.नं. १२४० लगतचा सि.स.नं. १२३८ हा सि.स.नं. १२३९ म्हणुन दुरुस्त करण्यात आलेला आहे. |
| M११ | मौजे-भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी सि.स.नं. १११६ पासुन सि.स.नं. ११०७ पर्यंतचे ९ मी. रस्ता रुंदीकरण रद्द करण्यात आलेले आहे व विद्यमान रस्त्याची रुंदी व आखणी कायम ठेवण्यात आलेली आहे. सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात यावे. |
| M१२ | मौजे-भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी येथील विद्यमान मंदिर सार्वजनिक / निम सार्वजनिक विभागात दर्शविण्यात आलेले आहे. |
| M१३ | मौजे-भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी येथील हिंदुस्थान मशिदीचे स्थान सार्वजनिक/निम सार्वजनिक विभागात मंजुर विकास योजनेप्रमाणे दर्शविण्यात आलेले आहे व लगतचा आ.क्र. ५६ या आरक्षणाच्या हद्दी सुधारीत करण्यात आलेल्या आहेत. |
| M१४ | मौजे-भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी येथील सि.स.नं. ११६२ पासुन सि.स.नं. २९३२ येथिल ६ मी. रुंद विद्यमान रस्त्याची रुंदी व आखणी मंजुर विकास योजनेप्रमाणे ६ मी. प्रस्तावित स्वरुपात नकाशात दर्शविण्यात आलेली आहे. |
| M१५ | मौजे-भिवंडी | मौजे भिवंडी, सि.स. नं. २८०७ ते २८१७ दरम्यानच्या रस्त्याची रुंदी व आखणी मंजुर विकास योजनेप्रमाणे प्रस्तावित ६ मी. रुंद विकास योजना रस्ता अशी दर्शविण्यात आलेली आहे. |
| M१६ | मौजे-भिवंडी | सौदागर मोहल्ला येथिल सि.स.नं. २८१७ ते २७४६ दरम्यानच्या रस्त्याची रुंदी व आखणी मंजुर विकास योजनेप्रमाणे प्रस्तावित ६ मी. रुंद दर्शविण्यात आलेली आहे. |
| M१७ | मौजे-भिवंडी | येथील नझराना सिनेमागृह मंजुर विकास योजनेप्रमाणे वाणिज्य वापर विभागामध्ये नकाशात दर्शविलेले आहे. |
| M१८ | मौजे भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी येथील सि.स.नं. २६१७ च्या पश्चिमेकडील सि.स.नं. २६१६ क्रमांकास सि.स.नं. २६१८ म्हणुन दुरुस्त करण्यात आलेला आहे. |
| M१९ | मौजे कामतघर | मौजे कामतघर मधील आरक्षण क्रमांक २१६, २१७ (भाग), २१८ (भाग) या आरक्षणा खालील जमिनीचे एकत्रीत आरक्षण तयार करुन त्यास क्रमांक २१६ स्लम इम्प्रुव्हमेंट स्किम करण्यात आलेले आहे व आरक्षण क्रमांक २१७ (भाग) व २१८ (भाग) चा मौजे फेणे गावातील भाग एकत्र करुन त्यास आरक्षण क्रमांक २१७ म्युनिसिपल रेस्ट हाऊस असे आरक्षण प्रस्तावित करण्यात आलेले आहे. आरक्षण क्रमांक २१८ टेक्सटाईल म्युझियम हे आरक्षण वगळण्यात आलेले आहे |
| M२० | मौजे नारपोली | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे नारपोली आ.क्र. १४९ या आरक्षणा खालील सव्हे नं. ५ ची हरकत सुधारीत करुन सदर आरक्षणाच्या जागेत स.नं. १५० असे दुरुस्त करण्यात आलेले आहे. |
| M२१ | मौजे नारपोली | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे नारपोली, सि.स.नं. ३२४ व ४८१ येथील विद्यमान कॉलेजच्या हद्दी सुधारीत करण्यात आलेल्या आहेत. या बदलामुळे मोकळी झालेली जागा लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेली आहे. |
| M२२ | मौजे-गौरीपाडा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. १२० (पंप) चे नामाभिधान बदलून पार्कींग असे करण्यात आलेले आहे. |
| M२३ | मौजे-गौरीपाडा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे विद्यमान "मशिद" हा शब्द बदलून "दर्गाह" करण्यात आलेला आहे. |
| M२४ | मौजे-गौरीपाडा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मंजुर विकास योजनेप्रमाणे दर्गाह दिवानशाह ऐवजी टँक (Tank) अशी दुरुस्ती करण्यात आली आहे. |
| M२५ | मौजे- चाविंद्रा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे चाविंद्रा मधील ३० मी. रुंद विकास योजना रस्त्याच्या दक्षिणेकडील सर्व्हे नं. १०८/७ ची जागा प्रोटेक्टेड फॉरेस्ट या झोन मधुन वगळण्यात आलेली आहे. सदर वगळलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M२६ | मौजे-भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. ५५ बगिचा व आ. क्र. ५६ क्रिडांगण या आरक्षणां खालील जागा एकत्रित करुन त्यास नामाभिधान बदलून आ.क्र. ५५ म्युनिसिपल पर्पज म्हणुन प्रस्तावित करण्यात आलेले आहे. तसेच आ.क्र. ५६ क्रिडांगण रद्द करण्यात आलेले आहे. |
| M२७ | मौजे-कणेरी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कणेरी येथील १२ मी. रुंद रस्त्याची आखणी उत्तरेस सि.स.नं. ६२५५ पासुन दक्षिणेस सि.स.नं. ५८७६ पर्यंत मंजुर विकास योजनेप्रमाणे प्रस्तावित करण्यात आलेली आहे. |
| M२८ | मौजे-कणेरी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कणेरी येथील कल्याण रस्त्याच्या जंक्शन पासुन मानसरोवर जक्शन पर्यंत रस्त्याची रुंदी २४ मी. ऐवजी १८ मी. रुंद करण्यात आलेली आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M२९ | मौजे कणेरी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कणेरी येथील विद्यमान ९ मी. रुंद रस्ता हा १२ मी. रुंद विकास योजना रस्ता म्हणुन प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर रस्त्याचे रुंदीकरण आ.क्र. ८१ व ८२ च्या समोरील बाजुस दर्शविण्यात आलेले आहे. |
| M३० | मौजे - नागाव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे नागांव गावठाणातील विद्यमान १८ मी. रुंद रस्ता हा नागांव गावठाणात १५ मी. रुंद प्रस्तावित विकास योजना रस्ता म्हणुन दर्शविण्यात आलेला आहे. सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे तसेच नागांव गावठाणा हद्दी बाहेर सदर रस्ता १८ मी. रुंद प्रस्तावित दर्शविण्यात आलेला आहे. |
| M३१ | मौजे - नागाव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे- नागांव येथील विद्यमान प्राथमिक शाळेचा वापर रद्द करण्यात आलेला आहे. सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M३२ | मौजे टेमघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे टेमघर येथील स.नं. ३२ ते स.नं. २३ पर्यंतच्या १८ मी. रुंद विकास योजना रस्ता हा १२ मी. रुंद विकास योजना रस्ता म्हणुन प्रस्तावित करण्यात आलेला आहे. सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M३३ | मौजे टेमघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे-टेमघर येथील विद्यमान कॉलेजच्या हद्दी मोजणी नकाशानुसार कायम करुन सदर जागेत दर्शविलेला कॉलेजचा सार्वजनिक /निम सार्वजनिक वापर वगळुन रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आलेला आहे. |
| M३४ | मौजे टेमघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. १८३ गार्डन या आरक्षणाच्या हद्दी मंजुर विकास योजने प्रमाणे दर्शविण्यात आलेल्या आहेत. सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M३५ | मौजे कामतघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कामतघर येथील मंजुर विकास योजनेतील सि.स.नं. ५८२९ पासुन सि.स.नं. ८६५६ पर्यंतचा १२ मी. रुंद रस्ता कायम करण्यात आलेले आहे. प्रस्तावित १२ मी. रुंद रस्त्याचे सि. स.नं ८६०४ पासुन ८६६० पर्यंतचे रस्त्याचे रुंदीकरण रद्द करण्यात आलेले आहे. सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M३६ | मौजे-निजामपुरा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. २७३ प्ले ग्राऊंड चे नामाभिधान बदलुन दफनभुमी (Burial Ground) असे करण्यात आलेले आहे. |
| M३७ | मौजे- नागांव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. ९६ स्पोर्ट कॉम्पलेक्स चे नामाभिधान बदलुन विस्थापितांसाठी घरे (Housing for Dishoused) असे करण्यात आलेले आहे. |
| M३८ | मौजे - निजामपुर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे विद्यमान पार्कींग ची हद्द सुधारीत करण्यात आलेली आहे. तसेच महानगरपालिकेच्या ताब्यातील उर्वरीत पार्कींगच्या जागेवर आ.क्र. २७५ बगिचाचे आरक्षण नव्याने प्रस्तावित करण्यात आलेले आहे. |

पान 04 वर ▶▶▶



# ठाणे जिल्ह्यात फुटणार १३३२ दहीहंड्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

दहीहंडीची पंढरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ठाणे जिल्ह्यात यंदा १ हजार ३३२ इतक्या दहीहंडीचे आयोजन केले जाणार आहे. यामध्ये १ हजार ८६ खाजगी तर २४६ सार्वजनिक दहीहंडी असणार आहेत. एकट्या ठाणे शहरात ५४३ दहीहंडीचे आयोजन केले आहे. त्यापाठोपाठ कल्याण, उल्हासनगर आणि भिवंडी या शहरातील चौक तसेच मुख्य मार्गावर, गृहसंकुलाच्या आवारात दहीहंडीचे आयोजन केले जाणार आहे. त्यापैकी ३० दहीहंडी या मानाच्या असणार आहेत. तसेच जन्माष्टमीनिमित्त कार्यक्रम आणि मिरवणुकीचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

ठाणे जिल्ह्यात दरवर्षी मोठ्या प्रमाणात दहीहंडी उत्सवाचे आयोजन केले जाते. मुंबई, ठाणे, रायगड, पुणे आणि नाशिक अशा विविध जिल्ह्यांतून गोविंदा पथके ठाणे शहरातील दहीहंडीच्या ठिकाणी थर रचण्यासाठी येत असतात. यावर्षी ठाणे जिल्ह्यातील ठाणे, डोंबिवली, कल्याण, उल्हासनगर, अंबरनाथ आणि भिवंडी या शहरांमध्ये १ हजार ३३२ इतक्या दहीहंड्यांचे आयोजन करण्यात आले आहे. यात १ हजार ८६ खाजगी तर २४६ सार्वजनिक दहीहंडी असणार आहेत. ठाणे शहरात टेंभीनाका मित्र मंडळ यांच्यावतीने टेंभीनाका येथे तर, आनंद चारिटेबल ट्रस्ट यांच्यावतीने चिंतामणी चौक, मनसेच्यावतीने भगवती मैदान, संकल्प प्रतिष्ठान यांच्यावतीने रहेजा गार्डन, संस्कृती प्रतिष्ठान यांच्यावतीने वर्तकनगर येथे मोठ्या दहीहंडीचे आयोजन केले जाणार आहे. गोविंदा पथकांना आकर्षित करण्यासाठी दहीहंडी आयोजकांकडून थरांचा विक्रम रचणाऱ्यांसाठी लाखोंच्या पारितोषिकांची घोषणा केली जात आहे. ठाणे पोलिस आयुक्तालयाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार ठाणे शहरात सर्वाधिक हंड्यांचे आयोजन केले जाणार आहे. यानंतर कल्याण, उल्हासनगर आणि भिवंडी येथे दहीहंड्यांचे आयोजन असेल.

दहीहंडी आधी मोठ्या भक्तीभावात साजरा होणाऱ्या श्रीकृष्ण जन्माष्टमीसाठी देखील ठाणे जिल्हा सज्ज झाला आहे. जन्माष्टमीनिमित्त कार्यक्रम आणि मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले आहे. जिल्ह्यात यावर्षी १५७ मंदिरांसह विविध ठिकाणी जन्माष्टमीचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये ठाणे २३, भिवंडी २९, कल्याण ४३, उल्हासनगर २५, वागळे इस्टेट ३७ या ठिकाणी जन्माष्टमीचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी ठाणे, कल्याण आणि भिवंडी शहरातून एकुण ४९ मिरवणुका काढण्यात येणार आहेत.



# नांदिवलीतील कबुतरखान्यामुळे रहिवासी हैराण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - कबुतरांच्या विष्ठा आणि पंखांमुळे होणाऱ्या व्याधींचा विचार करून न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे मुंबई महापालिकेने कबुतरांना खाद्य टाकणाऱ्या नागरिकांवर गुन्हे दाखल करण्यास सुरूवात केली आहे. डोंबिवली पूर्वेत नांदिवली रस्त्यावर प्रगती महाविद्यालयासमोरील पालिका जलकुंभ भागात मागील अनेक वर्षापासून हजारो कबुतरांचे आश्रयस्थान आहे. या कबुतरांना काही दात्यांकडून दररोज चार ते पाच पोतड्या खाणे घातले जाते. त्यामुळे या भागातील कबुतरांचा वावर दिवसेंदिवस वाढत असल्याने परिसरातील रहिवासी त्रस्त आहेत.

कबुतरांमुळे असाध्य अशा व्याधी होतात, याची जाणीव झाल्यापासून नांदिवली रस्ता भागातील रहिवाशांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. एकतानगर नांदिवली रस्ता भागात एक धर्मस्थळ आहे. या धर्मस्थळात दररोज पहाटेपासून भाविक येतात. प्राणीदया दाखविण्यासाठी सकाळपासून या भागात कबतुरांना खाद्य टाकले जाते. दिवसभरात चार ते पाच पोतड्या खाद्य एका इमारतीच्या गच्चीवर टाकण्यात येते. खाद्य खाऊन झाल्यानंतर ही सर्व कबुतरे परिसरातील इमारतींच्या गच्ची, खिडक्या, इमारतींवरील निवाऱ्यांवर बसतात, असे या भागातील रहिवाशांनी सांगितले.

या कबुतऱ्यांच्या वाढत्या उपद्रवामुळे आम्ही खिडक्यांना जाळ्या बसून घेतल्या आहेत. जाळी थोडी जरी उघडली तरी कबुतरे थेट घरात प्रवेश करतात. या कबुतरांच्या विषयावर पालिका, पोलीस ठाण्यात तक्रार केली तर नाहक काही प्राणीप्रेमींच्या, भक्तांच्या त्रासाला सामोरे जावे लागण्याची भीती असल्याने नांदिवली परिसरातील रहिवासी या विषयावर उघडपणे बोलण्यास किंवा तक्रार करण्यास तयार नाहीत. बाहेरगावी जाताना घर योग्यरितीने बंद केले नाहीतर थेट घरात कबुतरे आपले आश्रयस्थान तयार करतात, असे रहिवासी सांगतात.

मुंबईत दादर येथील कबुतरखाना बंदीच्या विषयावर मुंबई महापालिका प्रशासन आक्रमक झाले आहे. याठिकाणी खाद्य टाकणाऱ्यांवर पालिकेने गुन्हे दाखल करण्यास सुरूवात केली आहे. त्याच प्रमाणे कल्याण डोंबिवली पालिकेच्या आयुक्त, आरोग्य विभागाच्या वरिष्ठांनी नांदिवली रस्ता भागात दौरा करून या भागातील कबुतरांच्या आश्रयस्थानाची पाहणी करावी. या भागातील नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून या कबुतरांना शहराच्या बाहेर विशेष सोय करता येईल का यादृष्टीने विचार करण्याची मागणी या भागातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.

दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
ठाणे ■ गुरुवार ■ १४ ऑगस्ट २०२५
jeevandeepvartanews2020@gmail.com



# दिवा शहरात उभारला जाणार छत्रपती शिवरायांचा अश्वारूढ पुतळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : ठाणे शहरा लगत असलेल्या दिवा शहरात छत्रपती शिवाजी महाराजांचा आश्वारूढ पुतळा उभारला जाणार आहे. या कामासाठी राज्याच्या नगर विकास विभागाकडून दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. दिवा येथील आगासन भागात हा पुतळा उभारला जाणार आहे. दिवा शहरात मागील काही वर्षांपासून मोठ्याप्रमाणात नागरिकरण वाढले आहे. या भागात महाराजांचे स्मारक व्हावे अशी मागणी होती. दिवा शहर कल्याण लोकसभा मतदारसंघात येतो. या लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या पाठपुराव्यानंतर दिव्यातील आगासन रोड परिसरात छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य अश्वारूढ पुतळा उभारण्यात येणार आहे. या कामासाठी राज्याच्या नगर विकास विभागाकडून दोन कोटी रुपयांचा निधी मंजूर झाला आहे. यामुळे लवकरच आगसन येथे या पुतळ्याच्या प्रत्यक्ष उभारणीचे काम सुरु होणार आहे.



पान 03 वरून ▶▶▶

# भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका

| फेरबदल क्रमांक | गांवाचे नांव | फेरबदल / बदलांचा तपशील |
|---|---|---|
| M३९ | मौजे चाविंद्रा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. २६९ कत्तलखाना हे आरक्षण वगळण्यात आलेले आहे. सदर आरक्षणामधुन वगळलेली जागा आ.क्र. ४० पार्कमध्ये समाविष्ट करण्यात आलेली आहे. |
| M४० | मौजे नारपोली | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. १४५ पोलीस स्टेशन या आरक्षणाची दोन भागात विभागणी केली असुन उत्तरेस आ.क्र. १४४ लगत आ.क्र. १४५ पोलिस स्टेशन (क्षेत्र चार हजार चौ. मी.) प्रस्तावित करण्यात आलेले आहे व आ.क्र. १४५ च्या दक्षिणेकडील उर्वरीत भागात नव्याने आ.क्र. १४५ अ C & D Waste प्रस्तावित करण्यात आलेले आहे. |
| M४१ | मौजे गौरीपाडा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. ४९ उद्यान चे नामाभिधान बदलुन शैक्षणिक वापर असे करण्यात आलेले आहे. |
| M४२ | मौजे - कामतघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे, मौजे कामतघर सर्व्हे नं. ६०पै., ६१ पै. या जागेवरील आ.क्र. २६६ दफनभुमीचे क्षेत्र १५,००० चौ.मी. पैकी ७,५०० चौ.मी. क्षेत्र ख्रिश्चन समाजाच्या दफनभुमी करीता व उर्वरित क्षेत्र ७,५०० चौ.मी. लिंगायत / हिंदु समाजाच्या दफनभुमीकरीता आरक्षित करण्यात यावे. |
| M४३ | मौजे- निजामपुरा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे निजामपूर येथील विद्यमान माध्यमिक शाळा ही मंजुर विकास योजनेप्रमाणे शैक्षणिक वापरा मध्ये दर्शविण्यात आलेली आहे. |
| M४४ | मौजे टेमघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ. क्र. २५९ ट्रक टर्मिनल या आरक्षणाचे / हद्दीचे विकास परवानगी मधील क्षेत्र वगळण्यात येऊन ते रहिवास विभागात समाविष्ट केलेले आहे व उर्वरीत संपुर्ण आरक्षणाचे नामाभिधान बदलुन बस डेपो करण्यात आलेले आहे. |
| M४५ | मौजे भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी येथील ऐतिहासिक टिळक मंदिरा लगतच्या चौकात सि.स.नं. १२०० या जागेवरील रस्तारुंदीकरण रद्द करण्यात येऊन ते सि.स.नं. ११९९ या समोरील बाजुच्या जमीनीतुन दर्शविण्यात आलेले आहे. सि.स.नं. १२०० या जागेवरील रस्तारुंदीकरणातुन मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M४६ | मौजे-चाविंद्रा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. ४५ हाऊसिंग फॉर डीसहाऊस या आरक्षणाचा उत्तरेकडील भाग लगतच्या आ.क्र.४४ आर.ए. वाय. योजना या आरक्षणात समाविष्ठ करण्यात आलेला आहे व आ. क्र. ४५ हाऊसिंग फॉर डीसहाऊस या आरक्षणाचा दक्षिणेकडील भागाचे नामाभिधान आ. क्र. ४५ डॉ. बाबासाहेब आंबेडकर श्रम श्राफल्य योजना असे करण्यात आलेले आहे. |
| M४७ | मौजे नारपोली | नकाशात दर्शविल्याप्रमाणे सदर दफनभुमी कायम ठेऊन हद्द मंजुर विकास योजनेप्रमाणे कायम करण्यात आलेली आहे. |
| M४८ | मौजे- भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. १३ बस डेपो मधील पश्चिम उत्तर दिशेस (वायव्य दिशा) असलेली सुमारे ८६२.२१ चौ. मी. जागा आ.क्र. १३ बस डेपो च्या हद्दीतुन वगळण्यात आलेली आहे. सदर वगळलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M४९ | मौ. कामतघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कामतघर येथील १८ मी. रुंद रस्त्याची आखणी ही उत्तरेचा २४ मी. रस्ता व सर्व्हे नं. १०७ पर्यंत २४ मी. रस्ता या दरम्यानची आखणी मंजुर विकास योजने प्रमाणे कायम करण्यात आलेली आहे. आ.क्र. २२२ शॉपिंग सेटर याचे क्षेत्र रस्त्याच्या आखणीनुसार बदलण्यात आलेले आहे. प्रस्तावित रस्त्याच्या पश्चिमेकडील शॉपींग सेंटर या आरक्षणाची जागा आरक्षणातून वगळून लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेली आहे. |
| M५० | मो. कामतघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मोजे कामतघर येथील स.नं. १५२ दुरुस्त करुन १५३ करण्यात आलेला आहे. |
| M५१ | मौजे निजामपूर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे आ.क्र. १६ वॉटर वर्क्स मधील मंजुर परवानगीचे क्षेत्र वगळण्यात आलेले आहे व उर्वरीत आ.क्र. १६ वॉटर वर्क्स कायम करण्यात आलेले आहे. आरक्षणातुन वगळण्यात आलेले क्षेत्र रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M५२ | मौजे-पोगाव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या पाईपलाईनची आखणी मंजुर विकास योजने प्रमाणे दर्शविण्यात आलेली आहे. सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M५३ | मौजे टेमघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे डिस्पेंसरी व मॅटर्निटी होम ची हद्द वगळण्यात आलेली आहे. |
| M५४ | मौजे कणेरी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कणेरी येथील जुन्या मुंबई आग्रा रस्त्यापासुन (सि.स.नं. ५६६१ लगत व सि.स.नं. ५६८७ व ५६८८ मधुन) जाणारा विद्यमान रस्ता सि.स.नं. ५६८९ पर्यंत १२ मी. रुंद विकास योजना रस्ता म्हणुन प्रस्तावित करण्यात आलेला आहे. व त्यापुढे स.नं. ४४ (भाग) पर्यंत नव्याने प्रस्तावित १२ मी. रुंद विकास योजना रस्त्याची आखणी १५ मी. रुंदविकास योजना रस्त्यास जोडण्यात आलेली आहे. |
| M५५ | मौजे भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे गौरीपाडा गावठाणाची हद्द मंजुर विकास योजनेप्रमाणे सुधारीत करण्यात आलेली आहे. |
| M५६ | मौजे गौरीपाडा | नकाशात दर्शविलेल्या प्रमाणे ट्रक टर्मिनल मधुन विद्यमान पेट्रोल पंपाची जागा वगळून ती विद्यमान पेट्रोल पंप म्हणुन दर्शविण्यात आलेली आहे व उर्वरीत आ.क्र. ५१ ट्रक टर्मिनल म्हणून कायम करण्यात आलेले आहे. |
| M५७ | मौजे नारपोली | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे नारपोली येथील सि.स.नं. ७५१८ ते ८२४९ पूर्व पर्यंत जाणारा १८ मी. रुंद रस्त्याची आखणी डावीकडील विद्यमान स्मशानभुमीच्या दक्षिणेपर्यंत सुधारीत करण्यात आलेली आहे. |
| M५८ | मौजे भादवड | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भादवड प्रस्तावित आ.क्र. ४६ एस.टी.पी रद्द करण्यात आलेले आहे. सदर बदलामुळे वगळण्यात आलेले आरक्षणा खालील क्षेत्र लगतच्या शेती विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M५९ | मौजे भादवड | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भादवड मधील ६० मी. रिंगरोडची आखणी मंजुर विकास योजनेप्रमाणे सुधारीत करण्यात आलेली आहे. सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M६० | मौजे गौरीपाडा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे गौरीपाडा या जागेवरील ग्रेव यार्ड हा शब्द वगळून त्या ऐवजी मशीद (M) अशी दुरुस्ती करण्यात आलेली आहे. |
| M६१ | मौजे टेमघर | नकाशात दशविल्याप्रमाणे मौजे टेमघर पंचाल महानगरपालिका अधिनियमातील कलम २१० नुसार अस्तित्वातील ९ मी. रुंद रस्त्याला १२ मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. |
| M६२ | मौजे - भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी सि. स.नं. २०८३ पासून सि.स.नं २६०८ पर्यंतचा अस्तित्वातील ६ मी. रुंद रस्त्याला ९ मी. रुंदीचा रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. |
| M६३ | मौजे भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे भिवंडी येथील सि.स.नं. १७४ ऐवजी सि.स.नं. ४७४ पा प्रमाणे दर्शविण्यात आलेला आहे व तसेच प्रस्तावित नकाशावर सि. स.न. ४६९ दर्शविलेला आहे. |
| M६४ | मौजे- निजामपुरा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे-निजामपुर आ.क्र. २७० गार्डन रद्द करण्यात येऊन त्याचा उत्तरेकडील भाग ग्रिन झोन व दक्षिणे कडील भागात पश्चिम बाजुने ९ मी. रुंदीचा पोच रस्ता प्रस्तावित करुन उर्वरित जागा रहिवास विभागात समाविष्ट करण्यात आलेली आहे. |
| M६५ | मौजे-चाविंद्रा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे-चाविंद्रा आ.क्र. २७४ कन्व्हेशन सेंटर वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M६६ | मौजे पोगांव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे पोगांव आ.क्र.५ वॉटर वर्क्स वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M६७ | मौजे पोगाव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे पोगाव आ.क्र. ९ एम.एस.ई.बो हे आरक्षण वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M६८ | मौजे नागाव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे नागाव आ.क्र. १०२ वॉटर वर्क्स वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M६९ | मौजे कणेरी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कणेरी आ.क्र. १२७ पार्कांग हे आरक्षण वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M७० | मौजे-कामतघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कामतघर आ.क्र. २०६ वॉटर वर्क्स आरक्षण वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M७१ | मौजे निजामपुर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मोजे निजामपुर आ.क्र. २३ बॅाटर वर्क्स आरक्षण वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M७२ | मोजे-चाविंद्रा | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मोजे चाविंद्रा आ.क्र. ६ ट्रक टर्मिनल आरक्षण वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M७३ | मौजे-नागाव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मोजे-नागाव आ.क्र. ३१ मल्टी पर्पज हॉल आरक्षण वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M७४ | मौजे नागाव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे नागाव आ.क्र. ९४ गार्डन आरक्षण वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M७५ | मौजे - कामतघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कामतघर स.नं. ११३ या जागेत पोच रस्ता उपलब्ध होण्याच्या दृष्टीने (स.नं. ५६ पासून स.नं. १२१ पर्यंत) नविन १२ मी. रुंद विकास योजना रस्ता प्रस्तावित करण्यात आलेला आहे. |
| M७६ | मौजे-नागाव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे-नागाव आ.क्र.९५ सिवेज ट्रिटमेंट प्लांट हे आरक्षण वगळण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M७७ | मौजे-टेमघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे-टेमघर स.नं. १४१ मधुन व स.नं. १३३ पर्यंत जाणारा ९ मी. प्रस्तावित रुंद विकास योजना रस्ता रद्द करण्यात आलेला आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेला आहे. |
| M७८ | मौजे-भिवंडी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे-भिवंडी आ.क्र. ११९ वॉटर वर्क्स हे आरक्षण भिवंडी स.नं. १० पैकी व कणेरी स.नं. ५ पैकी (मौजे कणेरी सि. स.नं. ६३४४, मौजे भिवंडी सि.स.नं. ६७०२) या मोकळया जागेत स्थलांतरीत करण्यात आलेले आहे व सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे. |
| M७९ | मौजे कामतघर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कामतघर स.नं. ५७ येथील २४ मी. विकास योजना रस्त्याची आखणी दुरुस्त करण्यात आलेली आहे. सदर बदलामुळे मुक्त झालेले क्षेत्र लगतच्या वापर विभागात समाविष्ट करण्यात आलेले आहे |
| M८० | मौजे कणेरी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कणेरी, स.नं. १२, १४/१/अ, १३ येथील औद्योगिक वापर ऐवजी वाणिज्य वापर करण्यात येत आहे. |
| M८१ | मौजे पोगाव | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे पोगाव स.नं ९६ व मौजे चाविंद्रा स.नं. १०९ येथील ६० मी. रिंगरोड लगत महानगरपालिकेच्या ताब्यात असलेल्या १२०० चौ.मी. जागेमध्ये आरक्षण क्र. २७६-इंटेलिजेंस ब्यूरो कार्यालय हे आरक्षण प्रस्तावित करण्यात येत आहे. |
| M८२ | मौजे कणेरी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कणेरी येथील अंतिम भुखंड स.नं १२६-अ च्या आग्रेय दिशेला लागुन ३६ मी. विकास योजना रस्त्यालगत १००० चौ.मी. जागेमध्ये आ.क्र. २७७डॉक्टरांसाठी निवासी वसाहत हे आरक्षण प्रस्तावित करण्यात येत आहे व सदर आरक्षणापासुन ३६ मी. विकास योजना रस्त्यापर्यंत दक्षिण उत्तर दिशेला ९ मी. रुंदीचा रस्ता दर्शविण्यात येत आहे. |
| M८३ | मौजे कणेरी | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे कणेरी सर्वे नं. ५८ येथील आ.क्र. १६८ (सिमेटरी) या आरक्षणाचे नामाभिनिदान बदलुन म्युनसिपल पर्पज म्हणुन करण्यात येत आहे. |
| M८४ | मौजे निजामपुर | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे निजामपुर सि.स.नं.३९९३ पै, ३९९४ पे, ३९९५ पे येथील आ.क्र.१७ (गार्डन) या आरक्षणातील उत्तरेकडील एकुण ४००० चौ.मी. जागा आ.क्र. १८ WPS (SWM) मध्ये समाविष्ट करण्यात येत आहे व उर्वरीत जागा ही आरक्षण क्र. १७(गार्डन) म्हणून कायम करण्यात येत आहे. |
| M८५ | मौजे फेणे | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे फेणे सर्वे नं. १५ पै, १७ प येथील आ.क्र. २२६ म्युनिसीपल स्टाफ कॉटर्स या आरक्षणतील ईशान्य दिशेकडील एकुण ४००० चौ.मी. जागेत आरक्षण क्र.२२६ अ- WPS (SWM) प्रस्तावित करण्यात येत आहे व उर्वरीत जागा ही आ.क्र.२२६ म्युनिसीपल स्टाफ कॉटर्स म्हणुन कायम करण्यात येत आहे. |
| M८६ | मौजे नारपोली | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मोजे नारपोली सर्वे नं. १८ पै, १४ पै येथील आ.क्र. १४६ बगीचा या आरक्षणाचे नामाभिधान बदलुन सोशल वेल्फेअर सेंटर करण्यात येत आहे. |
| M८७ | मौजे नारपोली | नकाशात दर्शविल्याप्रमाणे मौजे नागांव सर्वे नं. ९३ पै, १७ पे येथील आ. क्र.९१ शैक्षणिक संस्था या आरक्षणातील मनपाच्या ताब्यातील ५००० चौ. मी. जागेमध्ये आरक्षण क्र. ९१-अ (पीएम ई-बस डेपो) प्रस्तावित करण्यात येत आहे व उर्वरीत जागा आरक्षण क्र. ९१ शैक्षणिक संस्था म्हणुन कायम करण्यात येत आहे. |

**सही/-**
**अनमोल सागर (भाप्रसे)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

***जावक क्रमांक : जसंवि/८८४/ दि. १३ ऑगस्ट २०२५**

***जावक क्रमांक : भिनिशमनपा/तांत्रिक/ससंनर/९८/२०२५ दि. १२ ऑगस्ट २०२५**

# कल्याणमधील शरद पवार गटाला खिंडार, शेकडो कार्यकर्ते शिंदेंच्या शिवसेनेत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** - कल्याणमधील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे माजी नगरसेवक उमेश बोरगावकर यांनी आपल्या शेकडो कार्यकर्त्यांसह शिंदे शिवसेनेत प्रवेश केल्याने कल्याणमधील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार खिंडार पडले आहे. कल्याणमधील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अस्तित्व जेमतेम होते. यामध्ये माजी नगरसेवक बोरगावकर हे पक्षाचे स्थानिक खंदे नेतृत्व होते.

ठाणे येथे दिवंगत आनंद दिघे आनंदाश्रमध्ये माजी नगरसेवक बोरगावकर यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे, जिल्हाप्रमुख गोपाळ लांडगे, उपजिल्हाप्रमुख राजेश कदम, आमदार विश्वनाथ भोईर, शहरप्रमुख रवी पाटील यांच्या उपस्थितीत माजी नगरसेवक उमेश बोरगावकर यांनी समर्थकांसह शिंदे शिवसेनेत प्रवेश केला. आगामी महापालिका निवडणुकीच्या तोंडावर हे पक्षप्रवेश महत्वाचे मानले जात आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या मोजक्या पदाधिकारी, कार्यकर्त्यांच्या बळावर कल्याणमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे अस्तित्व होते. यामध्ये माजी नगरसेवक उमेश बोरगावकर हे राष्ट्रवादी काँग्रेसची महापालिका आणि शहरातील बुलंद तोफ म्हणून ओळखली जात होती.

शहरातील नागरी समस्या, विकासाचे प्रश्न विषयावर यापूर्वी त्यांनी पालिका सभागृहात नेहमीच आवाज उठविला. पालिका सभागृहात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गटनेते पद त्यांनी भुषविले. कल्याण शहरातील नागरी समस्या विषयावरील आंदोलनात बोरगावकर आणि कार्यकर्त्यांचा सक्रिय सहभाग होता. आगामी महापालिका निवडणुका चार प्रभाग मिळून होणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसची शहरातील ताकद पाहता यात आपला टिकाव लागणार नाही. असा विचार करूनही काही कार्यकर्त्यांनी आपली पुढच्या राजकीय कारकिर्दीची सोय शिंदे शिवसेनेत येऊन केली असल्याची चर्चा आहे.



Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com